# महाराष्ट्र शासन.

## जिल्हा शल्यचिकित्सक जिल्हा सामान्य रुग्णालय रायगड अलिबाग.

कार्यालयाचा दुरध्वनी क्रांक : ०२४१ २२२१५७ Email :- csraigad70@gmail.com
कार्यालयाचा पत्ता :- जिल्हा सामान्य रुग्णालय रायगड अलिबाग जिल्हा परिषदे समोर.

जिल्हा शल्यचिकित्सक रायगड अलिबाग व अधिपत्याखालील उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालयातील तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी रायगड जिल्हा परिषद यांचे अधिपत्याखालील प्रा.आ.केंद्रातील वैदयकिय अधिकारी गट-अ संवर्गातील विशेपतज्ञ व एमबीबीएस तसेच वैदयकिय अधिकारी बीएएमएस गट-ब संवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पूरत्या स्वरुपात मानधन तत्वावर भरण्यासाठी खालील प्रमाणे जाहिरात देण्यांत येत आहे.

## जाहिरात.

- आदिवासी व दुर्गम क्षेत्रात काम करणा-या एमबीबीएस वैदयकिय अधिका-यांना रु.८०,०००/- व विशेपज्ञ अर्हताधारक वैदयकिय अधिका-यांना रु.९००००/- इतके एकत्रित मानधन अनुज्ञेय राहील.
- इतर क्षेत्रात काम करणा-या एमबीबीएस वैदयकिय अधिका-यांना रु.७५,०००/- व विशेपज्ञ अर्हताधारक वैदयकिय अधिका-यांना रु.८५०००/- इतके एकत्रित मानधन अनुज्ञेय राहील.
- प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त पदावर एमबीबीएस पात्रता धारण केलेले वैदयकिय अधिकारी प्रयत्न करुनही उपलब्ध न झाल्यास त्या ठिकाणी बीएएमएस अहर्ताधारक उमेदवरांना नियुक्ती देण्यांत येईल. सदर पदावर एमबीबीएस/ विशेपतज्ञ आर्हतधारक उमेदवार नियुक्त झाल्यास बीएएमएस आर्हताधारक उमेदवाराची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल बीएएमएस आर्हताधारक वैदयकिय अधिका-यांना आदिवासी व दुर्गम भागात काम करणा-या वैदयकिय अधिका-यांना रु.४५०००/- इतके व इतर भागात काम करणा-या वैदयकिय अधिका-यांना रु.४००००/- इतके एकत्रीत मानधन अनुज्ञेय राहील.
- मुलाखतीच्या दिनांकास रिक्त असलेली पदे समुपदेशनासाठी दर्शनिय भागावर दर्शविण्यांत येतील.
- वैदयकिय अधिका-यांची नेमणुक ११ महिन्यासाठी राहील. तसेच कंत्राटी वैदयकिय अधिकारी हे नियमित कर्मचा-याप्रमाणे कोणतेही फायदे मिळविण्यास पात्र असणार नाहीत.
- खुल्या प्रवर्गासाठी वयोमर्यादा कमाल ३८ वर्षे व आरक्षीत प्रवर्गासाठी ४३ वर्षे पर्यंत राहील.
- वैदयकिय अधिकारी यांनी महाराष्ट्र वैदयकिय परिषदेचे नोंदणी प्रमाणपत्र, एमबीबीएस/बीएमएस गुणपत्रिका सर्व वर्षाच्या पदवी / पदविका गुणपत्रिका व प्रमाणपत्र, आंतरवासीता प्रमाणपत्र, जात व जात वैधता प्रमाणपत्र शाळा सोडल्याचा दाखला वयाचा पुरावा, आधार कार्ड ई. मुळ कागदपत्र व त्यांच्या छायांकित प्रतीचा एक संच व पासपोर्ट साईज फोटोसह उपस्थीत रहावे.
- नियमित वैदयकिय अधिकारी उपलब्ध झाल्यानंतर कंत्राटी पध्दतीने सर्वात कनिष्ठ वैदयकिय अधिका-यांच्या सेवा समाप्त करण्यांत येतील.
- शासन सेवा शर्ती खाली ही सेवा नसल्याने त्याअनुपंगाने मिळणारे निवृत्ती वेतन,एनपीएस, विमा योजना, भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणत्याही प्रकारचे लाभ मिळण्यास पात्र राहणार नाहीत. वैदयकिय अधिका-यांची नियुक्ती कंत्राटी स्वरुपाची असल्याने सदर पदावर कायम करण्याबाबत भविष्यात अधिकार सांगता येणार नाही अशा आशयाचे बंधपत्र रु. १०० स्टॅपपेपरवर घेण्यांत येईल.
- पुर्ननियुक्ती देण्यांत येणा-या वैदयकिय अधिका-यांना एक महिन्याचा खंड देण्यांत येईल.
- सदर कंत्राटी वैदयकिय अधिका-यांना म.ना.से (वर्तणूक) नियम १९७९ मधील तरतुदी लागू राहतील.
- सदर कंत्राटी वैदयकिय अधिका-यांना सेवा काळात सेवामुक्त व्हायचे असल्यास त्यांना एक महिन्याची नोटीस किंवा एक महिन्याचे वेतन भरुन कार्यमुक्त होता येईल.
- ५८ वर्षे पुर्ण करुन सेवा निवृत्त झालेले वैदयकिय अधिकारी, शिस्तभंगाच्या कारणास्तव सेवा समाप्त केलेले वैदयकिय अधिकारी, अनधिकृत गैरहजर असलेले व शासन सेवेतुन काढुन टाकलेले व संपामध्ये भाग घेतलेले वैदयकिय अधिकारी, कंत्राटी म्हणून नियुक्ती मिळाल्यानंतर कालावधी पूर्ण होण्यापूर्वी परवानगी न घेता गैरहजर असलेले व सोडून गेलेले वैदयकिय अधिकारी यांना पुन्हा नियुक्ती मिळणार नाही.
- जहिरात प्रसिध्दीच्या तारखपासून येणा-या १५ तारखेला व ३० तारखेला मुलाखती ठेवण्यांत येत आहेत. सदर तारखेला सुट्टी असल्यास दुस-या दिवशी ही प्रक्रिया राबविण्यांत येईल. संबधित वैदयकिय अधिका-यांनी १५ तारखेच्या मुलाखतीसाठी दिनांक १ ते १४ तारखेपर्यंत व ३० तारखेच्या मुलाखतीसाठी दिनांक १६ ते २९ तारखे दरम्याने कार्यालयीन वेळेत जिल्हा रुग्णालय रायगड अलिबाग येथे अर्ज करावेत. अर्जाचा विहीत नमुना कार्यालयात उपलब्ध करुन दिला जाईल. मुलाखत मा. जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांचे कार्यालयात घेण्यांत येतील.
- उक्त दर्शविण्यांत आलेल्या अटी मध्ये बदल करण्याचे प्राधिकार नियुक्ती प्राधिकारी यांचेकडे राखुन ठेवलेले आहेत.

०१/३/२१

सदस्य सचिव तथा जिल्हाशल्यचिकित्सक,
जिल्हा सामान्य रुग्णालय ...

Scanned with CamScanner